**प्रक्रीया उदयोग (मिरची मसाले, हळद)**



**उद्योजक शेतकरी महीलेचे नाव : सौ. अर्चना विजय रोकडे**

पत्ता : मु.पो.मादणी, ता. बाभुळगांव
जिल्हा: यवतमाळ

संपर्कासाठी दुरध्वनी क्रमांक : ९७६७०८७७२५,८०८०२८८६२७

वय : ३४ वर्ष

शिक्षण : इयत्ता १२ वी

**१. कृषि विज्ञान केंद्राचे प्रक्रीया उदयोग (मिरची मसाले, हळद) व्यवसायाकरीता मार्गदर्शन**

सौ. अर्चना विजय रोकडे हया मादणी दत्तक गावातील संपर्क महिला असून हया भुमिहीन शेतकरी महीला आहेत. अर्चनाताई हया कृषि विज्ञान केंद्र, यवतमाळ अतंर्गत राबविण्यात येत असलेल्या पिक प्रात्याक्षिक कार्यक्रम, प्रशिक्षण, जनजागृती कार्यक्रमामध्ये सक्रीय सहभाग नोंदवितात, व त्यांचे महत्व इतर शेतकरी महीलांना पटवून देतात. त्या अनुषंगाने त्यांच्यामध्ये अंर्गीकृत नेतृत्व कौशल्य असल्यामुळे व कृषि विज्ञान केंद्राची तांत्रीक मदत घेवून बचत गट निर्मीतीची संकल्पना मनात आली व त्यांनी ती प्रत्यक्षात उतरवली.

सन २०१७ मध्ये तुळजाभवाणी स्वंय सहायता महिला बचत गटाची स्थापना केली बचत गटाच्या बचतीतून महिलांनी उदयोग निर्मीती करण्याचा निर्धार केला. गटाला उत्पन्न निर्मीती करीता प्रक्रीया उदयोग (मिरची मसाले, हळद) निवड केली.

**२. प्रक्रीया उदयोग (मिरची मसाले, हळद) व्यवसायातून साध्य**

बचत गट हा कृषि विज्ञान केंद्राच्या माध्यमातून उमेद अंतर्गत संलग्न केला व त्यामधून त्यांना १५००० रू व संजीवणी संस्था च्या मार्फत १५००० रू अशी एकुण ३०००० रू भांडवल प्रक्रीया उदयोग (मिरची मसाले, हळद) निर्माण केले.

त्यामधून त्यांनी काडप मशिन व इ. लागणारे साहीत्याची खरेदी करून व्यवसायाची सुरूवात केली. महिण्याखेरीज अंदाजीत ३० किलो मिरची ३० रू दराने तयार करून देतात त्यामध्ये त्यांना ९०० रू व अंदाजित ५ किलो मसाला ४० रू दराने तयार करून देतात त्यामध्ये त्यांना २०० रू व हळद पिक ४० किला ३० रू दराने तयार करून त्यामध्ये त्यांना १२०० रू आर्थिक निर्मीती गटाला मिळू लागली.

दर महा एकुण रू २३०० रू आर्थिक उत्पन्नातून लाईट बिल व मजूरी खर्च वजा करता १५०० रू निवळ नफा मिळतो. गावामध्ये लोकांकडून मिळणाऱ्या प्रतिसादामुळे शेवळया, अगरबत्ती निर्मीती, मिनी दाळ प्रक्रिया उदयोगाकडे वळण्याचा त्यांनी निश्चय केला.

सौ. अर्चना विजय रोकडे हयानी आपल्या कुटुंबातील महत्वाची कामे सफल करून फावल्या वेळेत प्रक्रीया उदयोग (मिरची मसाले, हळद) ची कामे करीत आहे.

.



तुळजाभवाणी स्वंय सहायता महिला बचत गटाच्या माध्यमातून प्रक्रीया उदयोग (मिरची मसाले, हळद)



तुळजाभवाणी स्वंय सहायता महिला बचत गटाच्या माध्यमातून प्रक्रीया उदयोग (मिरची मसाले, हळद).